N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** बदनापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0006 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/01/2024 23:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 03/01/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/01/2024

**Time From (वेळेपासून):** 15:04 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/01/2024 **Time (वेळ):** 23:17 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/01/2024 23:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय बदनापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जगदिश लक्ष्मीकांत ओजा

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्रं.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बालाजी गल्ली बदनापुर,बदनापूर,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बालाजी गल्ली बदनापुर,बदनापूर,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेविका सुमन उध्दवराव मोरे नोकरी तहसीलदार वर्ग-1 | | | 1. रा अप्रतिम वास्तु, चाटे स्कुल , सातारा परिसर छत्रपती संभाजीनगर,बदनापूर,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | निलेश धर्मराज गायकवाड | | | 1. पोलीस कॉलणी,पोलीस मुख्यालय जालना,बदनापूर, जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 30,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 03.01.2024.

फिर्याद

मी जगदिश लक्ष्मीकांत ओझा, वय 28 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी रा.बालाजी गल्ली बदनापुर जि.जालना मोबाईल नंबर 9881781287/ 8669135945.

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 03.01.2024 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी माझ्या आई वडीलांसह एकत्र राहत असुन मी मेटारोल या कंपनीत खाजगी नोकरी करतो. माझे वडील नामे लक्ष्मीकांत रामप्रसाद ओझा यांना एकुण तीन भाऊ नामे श्रीनिवास, रामनिवास, श्रीवल्लभ तसेच दोन बहीण नामे कावेरा ओमनारायण समुद्र व सुनिता देवकीनंदन शर्मा असे आहे.

माझे आजोबा नामे रामप्रसाद चंदुलाल ओझा हे दिनांक 15.02.1982 रोजी मयत झालेले असुन त्यांच्या नावावरील मौजे बदनापुर शिवारातील शेत गट क्रमांक 85 मध्ये 01 आर, गट क्रमांक 86 मध्ये 01 हेक्टर 52 आर, रामखेडा गट क्रमांक 9 मध्ये 01 हेक्टर 10 आर जमीन ही माझे मोठे चुलते नामे श्रीनिवास रामप्रसाद ओझा यांचे नावे एकत्रीत कुटुंब कर्ता म्हणुन झालेली आहे. माझे चुलते रामनिवास, श्रीवल्लभ, वडील व दोन्ही आत्या यांनी मिळुन 7/12 वरील श्रीनिवास रामप्रसाद ओझा यांचे नावे एकत्रीत कुटुंब कर्ता म्हणुन असलेले नाव कमी करुन सर्व वारसांचे नाव लावण्याचे ठरले होते.

त्यावरुन मी दिनांक 24.08.2023 रोजी तहसील कार्यालय बदनापुर येथे जावुन माझ्या वडीलांच्या नावे अर्ज दिला होता. सदर अर्जावर तहसील कार्यालय बदनापुर येथे तहसीलदार यांच्या समक्ष सुनावण्या झालेल्या आहेत. दिनांक 13.12.2023 रोजीच्या सुनावणी मध्ये तहसील कार्यालय बदनापुर येथे तहसीलदार सुमन मोरे यांनी सदरचे प्रकरण निकालीसाठी राखुन ठेवले होते.

मी दिनांक 21.12.2023 रोजी तहसील कार्यालय बदनापुर येथे तहसीलदार सुमन मोरे यांच्या कक्षात जावुन आमच्या प्रकरणाबाबत चौकशी केली. त्यावेळी सदर कक्षात कर्मचारी गायकवाड हे पण हजर होते. त्यावेळी तहसीलदार सुमन मोरे यांनी मला सांगितले की, तुमच्या प्रकरणात प्रतीवादी हजर नसल्याने तुमच्या बाजुने एकतर्फी निर्णय देण्यासाठी आम्हाला 50,000/-रुपये दयावे लागेल असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पैसे खुप जास्त होतात मी आमच्या घरच्या सोबत चर्चा करुन दहा बारा दिवसात येऊन भेटतो असे सांगुन तेथुन घरी गेलो.

त्यावर मी माझे घरच्या सोबत चर्चा केली असता मला ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार करण्यास सांगितले. त्यानंतर मला खाजगी कामानिमित्त वेळ मिळाला नसल्याने मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मला तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर त्या आमचे काम करणार नाही. त्यांनी माझ्या कडे लाच मागितल्यास त्यांचे वर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची लेखी तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी

तक्रार त्यांना दाखविली. मी दिलेल्या लेखी तक्रारीवर मी, पंचानी व श्री.बिडवे साहेब यांनी सह्या केल्या.

मी तहसील कार्यालय बदनापुर येथील तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? त्या माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी दिनांक 03.01.2024 रोजी श्री.बिडवे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने व मी माझी हिरो कंपनीची एचएफ डिलक्स मोटार सायकल क्रमांक एमएच 21 बीएच 4069 ने रवाना होऊन कृषी संशोधन बदनापुर येथे थांबलो. त्याठिकाणी श्री.बिडवे साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात व्हाईस रेकॉर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 तडवी यांचे सोबत तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 तडवी असे आम्ही तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांना भेटण्यासाठी बदनापुर येथील तहसील कार्यालयात जाण्यासाठी माझ्या मोटार सायकलने गेलो. बदनापुर येथील तहसील कार्यालयात जावुन गाडी पार्किंग मध्ये उभी करुन पायी चालत जावुन तहसीलदार यांच्या कक्षात जाऊन तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांची भेट घेतली. त्यावेळी माझी, तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांचेत आपसात कामासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी कर्मचारी गायकवाड यांनी पंच क्र.1 तडवी यांचे समक्ष तुम्ही काय देता सांगा पटकन, देऊन दया लगेच असे म्हणाले असता मी तीस हजार असे म्हणालो असता तहसीलदार सुमन मोरे हया बर करते मी असे म्हणाल्या. त्यावरुन मी व पंच क्र.1 तडवी असे आम्ही कृषी संशोधन बदनापुर येथे परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.बिडवे साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड हे माझ्या प्रकरणात प्रतीवादी हजर नसल्याने एकतर्फी आमच्या बाजुने निर्णय देण्यासाठी 30,000/-रुपये लाच स्विकारण्यास संमती दिली असल्याचे पंचा समक्ष लाच पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले.

त्यावरुन तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांचे विरुध्द दिनांक 03.01.2024 रोजी बदनापुर येथील तहसील कार्यालयात सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन खाजगी वाहनात पोलीस अंमलदार श्री.बुजाडे यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 60 नोटा एकुण 30,000/- रुपये रक्कमेला ॲथ्रासीन पावडर लावली. सदरील ॲथ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. श्री.बिडवे साहेबांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांनी लाच स्विकारल्या नंतर तहसील कार्यालयाच्या बाहेर येऊन उजव्या हाताची शर्टाची बाही वर करुन इशारा करणे बाबत मला सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सूचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री. बुजाडे यांना सापळा पथकातुन वगळुन पंच क्र.2 श्रीमती शिंगणे यांच्या सोबत राहण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर लाच मागणी पडताळणी व सापळापूर्व पंचनामा केला.

त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. मला व पंच क्र.1 तडवी यांना तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांना भेटण्यासाठी बदनापुर येथील तहसील कार्यालयात पाठविले. मी व पंच क्र.1 तडवी असे आम्ही माझ्या मोटार सायकलने बदनापुर येथील तहसील कार्यालयाच्या आवारात गेलो. माझ्या पाठीमागे श्री.बिडवे साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 यांचे सह खाजगी वाहनाने बदनापुर येथे तहसील कार्यालय बदनापुर च्या आवारात आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने परिसरात सापळा लावून थांबले.

मी तहसीलदार सुमन मोरे यांना तहसील कार्यालय बदनापुर येथील त्यांच्या कक्षात जावुन भेटलो. त्यावेळी मी मॅडम ते तुम्ही सांगितलेले तीस हजार रुपये आणले ते गायकवाड कडे देऊ का तुमच्या कडे असे म्हणालो असता त्यांनी हाताने इशारा करुन कर्मचारी गायकवाड यांच्या कडे बर देऊन टाक असे सांगितले. त्यावर मी तहसील कार्यालयात कर्मचारी गायकवाड यांचा शोध घेतला असता ते मिळुन आले नाही. त्यानंतर मी तहसील कार्यालयाच्या मुख्य दरवाजा जवळील पायऱ्यावर बसलो असता थोडा वेळाने कर्मचारी गायकवाड हे तेथे आले. आम्ही बोलत बोलत कर्मचारी गायकवाड यांच्या कक्षात गेलो. त्यावेळी मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यातुन ॲन्थ्रासिन पावडर लावलेले 30,000/- रुपये काढुन कर्मचारी गायकवाड हयांचे समोर धरले असता कर्मचारी गायकवाड यांनी किती तीस हेत का असे विचारले. त्यावर मी मोजुन घ्या असे म्हणालो असता त्यांनी त्यांचे

उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिश्यात ठेवुन मी कशाला मोजु आता असे म्हणाले. त्यानंतर कर्मचारी गायकवाड हे तहसीलदार सुमन मोरे यांच्या कक्षात गेले असता मी व पंच क्र.1 तडवी असे आम्ही कक्षाच्या दरवाजाजवळ जावुन थांबलो. त्यावेळी कर्मचारी गायकवाड यांनी त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिश्यात ठेवलेले 30,000/-रुपये लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन तहसीलदार सुमन मोरे यांच्या कडे दिली असता तहसीलदार सुमन मोरे यांनी ती त्यांच्या उजव्या हाताने घेऊन त्यांच्या टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवली. त्यानंतर मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. ती वेळ दुपारी अंदाजे तीन वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 यांचे सह त्या ठिकाणी आले. श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांनी पंच क्र.1 तडवी यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 तडवी यांनी तेथे हजर असलेले कर्मचारी गायकवाड यांच्या कडे अंगुली निर्देश करुन हयांनी तक्रारदार यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिश्यात ठेवली व तहसीलदार यांच्या कक्षात येऊन तहसीलदार सुमन मोरे यांना त्यांच्या उजव्या हाताने दिले असता सुमन मोरे यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने घेऊन टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवली आहे असे सांगितल्याने तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांना पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर तहसीलदार सुमन मोरे व कर्मचारी गायकवाड यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुमन उध्दवराव मोरे वय 50 वर्षे व्यवसाय नोकरी तहसीलदार वर्ग-1 तहसील कार्यालय बदनापुर जि.जालना रा.अप्रतिम वास्तु, चाटे स्कुल जवळ, सातारा परिसर छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. तसेच कर्मचारी गायकवाड यांनी त्यांचे नाव निलेश धर्मराज गायकवाड वय 34 वर्ष व्यवसाय नोकरी महसुल सहायक, तहसील कार्यालय बदनापुर रा.पोलीस कॉलनी, पोलीस मुख्यालय जालना असे सांगीतले. तहसीलदार सुमन मोरे यांना स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र.2 श्रीमती शिंगणे यांनी ड्रावर मधुन लाचेचे 30,000/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर सदर कक्षातील लाईट खिडक्या बंद करुन काळया कपडयाच्या सहायाने अंधार करुन श्री.बिडवे साहेबांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने तहसीलदार सुमन मोरे याचे हात, ड्रावर व लाचेच्या नोटा चेक केल्या असता तहसीलदार सुमन मोरे यांचे उजव्या हाताचे बोटावर, ड्रावरच्या आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच महसुल सहायक गायकवाड यांचे हात व अंगावरील कपडे चेक केले (शब्द मर्यादा असल्याने गुन्ह्याची मुळ फिर्याद सोबत जोडले आहे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Babasaheb Shivaji Kharde
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): POBN79340
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदा
पो.स्टे.बदनापूर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SUDAM BHAUSAHEI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN82519

जे आर्द्र-खराात
WASI/933